International Journal of
Science, Architecture, Technology and Environment

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA, 2005) ते विकसित भारत-गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण) [VB-G RAM G अधिनियम, 2025]: एक तुलनात्मक अभ्यास

दर्शनकुमार ना. चांभारे[1*]

[1] *कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा – 442201*

[*] *ई-मेल: darshan171191@gmail.com*

DOI: https://doi.org/10.63680/ijsate0126000.001

1. सारांश (Abstract)

सन 2005 मध्ये लागू झालेल्या MGNREGA ने दोन दशकं ग्रामीण भारताला 100 दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी दिली. ग्रामीण अर्थव्यवस्था, दारिद्र्याचे स्वरूप आणि तंत्रज्ञानात झालेल्या बदलाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने 2025 मध्ये VB-G RAM G अधिनियम आणला. या संशोधनात दोन्ही कायद्यांची रोजगार हमी, निधी वाटप, नियोजन रचना, तंत्रज्ञान आणि पारदर्शकता या मुद्द्यांवर तुलना केली आहे. निष्कर्ष असा आहे की नवीन योजना ही फक्त दिवस वाढवणारी योजना नसून, मागणी-आधारित हक्क योजनेपासून ते नियोजन-आधारित, उपजीविका-केंद्रित आणि तंत्रज्ञान-आधारित मिशनकडे झालेला संरचनात्मक बदल आहे. मात्र निधी वाटपातील बदलामुळे राज्यांवरील आर्थिक भार हीच सर्वात मोठी आव्हाने ठरणार आहेत.

Keywords: MGNREGA, VB-G RAM G, ग्रामीण रोजगार, आजीविका, निधी वाटप, विकसित भारत @2047

2. प्रस्तावना व पार्श्वभूमी

- MGNREGA (2005) ही जगातील सर्वात मोठी रोजगार हमी योजना मानली जाते. तिचा उद्देश केवळ मजुरी देणे नव्हता, तर ग्रामीण मालमत्ता निर्मिती, स्थलांतर थांबवणे आणि महिलांना आर्थिक बळ देणे हा होता. गेल्या 20 वर्षांत ग्रामीण भारत बदलला. दारिद्र्य घटले, उपभोग वाढला आणि डिजिटल व्यवहार वाढले. जुन्या रचनेत विभागनिहाय स्वतंत्र नियोजन, निधीचा अपव्यय आणि हंगामी मजूर टंचाई या समस्या होत्या. त्यावर उपाय म्हणून VB-G RAM G (2025) आणला गेला.

3. संशोधनाची उद्दिष्टये

1. MGNREGA व VB-G RAM G यांच्यातील कायदेशीर व संरचनात्मक फरक स्पष्ट करणे.
2. रोजगार हमी, बेरोजगारी भत्ता व किमान मजुरीतील बदलाचे विश्लेषण करणे.

3. निधी वाटपातील बदलाचा केंद्र-राज्य संबंधांवर होणारा परिणाम तपासणे.
4. नवीन नियोजन व तंत्रज्ञान रचनेचे मूल्यमापन करणे.

4. संशोधन पद्धती (Methodology)

- हे संशोधन पूर्णपणे दुय्यम स्रोतांवर (Secondary Data) आधारित आहे.
- **स्रोत:** संसदेत मंजूर विधेयक, VB-G RAM G अधिनियम 2025, PRS Legislative Research, केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाची अधिसूचना व मसुदा नियम, राज्य शासन परिपत्रके.

5. कायदेशीर प्रवास (Timeline)

दिनांक	घटना
16 डिसेंबर 2025	VB-G RAM G विधेयक लोकसभेत सादर
18 डिसेंबर 2025	लोकसभा व राज्यसभा दोन्ही सभागृहांत मंजूर
21 डिसेंबर 2025	राष्ट्रपतींची अनुमती - अधिनियमात रूपांतर
11 जून 2026	केंद्र सरकारकडून औपचारिक अधिसूचना जारी
21 जून 2026	मसुदा नियमांवर सार्वजनिक हरकती व सूचना
30 जून 2026	पंचायत, तालुका व जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट
1 जुलै 2026	संपूर्ण देशात कायदा प्रत्यक्ष अंमलात - मनरेगाची जागा घेतली

6. तुलनात्मक विश्लेषण - काय बदलले?

6.1 रोजगार हमी : 100 वरून 125 दिवस

- MGNREGA मध्ये प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वर्षाला किमान 100 दिवस अकुशल कामाची हमी होती. VB-G RAM G मध्ये ती 125 दिवसांपर्यंत वाढवली आहे. ही 25% वाढ आहे.

6.2 बेरोजगारी भत्ता : अधिक स्पष्ट सूत्र

- जुन्या योजनेत 15 दिवसांत काम न मिळाल्यास भत्ता लागू होत असे. नवीन योजनेत तरतूद कायम ठेवली असून सूत्र ठरवले आहे:
- पहिल्या 30 दिवसांसाठी मजुरी दराच्या किमान 1/4 रक्कम
- उर्वरित कालावधीसाठी मजुरी दराच्या किमान 1/2 रक्कम

6.3 किमान मजुरी दर : राष्ट्रीय तळ निश्चित

- जुन्या योजनेत राज्यनिहाय भिन्न दर होता, राष्ट्रीय तळ नव्हता. नवीन योजनेत राष्ट्रीय स्तरावर किमान मजुरी दर ₹300 प्रति दिवस अधिसूचित करण्यात आला आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षाचा दैनंदिन मजुरी दर ₹317 निश्चित करण्यात आला आहे.

6.4 निधी वाटप : सर्वात मोठा व मूलभूत बदल

- **जुनी रचना:** मजुरीचा संपूर्ण खर्च केंद्र सरकार उचलत असे. साहित्य खर्चाच्या 3/4 पर्यंत हिस्सा व प्रशासकीय खर्चाचा काही भाग केंद्राकडून, तर राज्य सरकार साहित्य खर्चाचा 1/4 हिस्सा, प्रशासकीय खर्च, बेरोजगारी भत्ता व विलंब-भरपाई उचलत असे.

- **नवीन रचना:** योजना आता केंद्र पुरस्कृत योजना (Centrally Sponsored Scheme) म्हणून राबवली जाणार आहे.

- सर्वसाधारण राज्यांसाठी - 60:40 (केंद्र:राज्य)

- ईशान्येकडील व हिमालयीन राज्यांसाठी - 90:10

- बेरोजगारी भत्ता व विलंब-भरपाईचा खर्च पूर्वीप्रमाणेच राज्य शासनावर राहील. तसेच केंद्राने निश्चित केलेल्या राज्यनिहाय प्रमाणित वार्षिक तरतुदीपेक्षा (Normative Allocation) अधिक खर्च झाल्यास तो अतिरिक्त भार राज्य शासनास स्वतः उचलावा लागेल.

7. तुलनात्मक तक्ता

मुद्दा	जुनी मनरेगा (2005)	नवीन VB-G RAM G (2025)
रोजगार हमी	100 दिवस	125 दिवस
बेरोजगारी भत्ता	15 दिवसांत काम न मिळाल्यास लागू	पहिले 30 दिवस 1/4 व नंतर 1/2 दर
निधी वाटप	केंद्र: मजुरी 100%, साहित्य 75%	केंद्र-राज्य 60:40, 90:10
योजनेचे स्वरूप	मागणी-आधारित हक्क योजना	केंद्र पुरस्कृत योजना
हंगामी विराम	तरतूद नाही	60 दिवसांपर्यंत
नियोजन	विभागवार आराखडे	विकसित ग्रामपंचायत आराखडा
तंत्रज्ञान	MIS, NREGAsoft, ABPS	बायोमेट्रिक, भू-स्थानिक प्रणाली, मोबाईल डॅशबोर्ड
किमान मजुरी	राज्यनिहाय	राष्ट्रीय तळ ₹300/दिवस

8. नवीन योजनेचे फायदे

- अधिक रोजगार दिवस

- राष्ट्रीय किमान वेतन तळ

- शाश्वत मालमत्ता निर्मिती

- महिला-नेतृत्व विकासाला चालना
- पारदर्शकता व कार्यक्षमता
- विभागीय अभिसरण
- हंगामी शेतमजूर टंचाई टाळणे
- विकसित भारत @2047 शी सुसंगती

9. आव्हाने व चिंता (Critical Analysis)

- या संशोधनाचे महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे लाभ वाढले असले तरी आर्थिक जबाबदारीचे हस्तांतरण झाले आहे. राज्यांना 40% हिस्सा द्यावा लागणार आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत राज्यांना Normative Allocation पेक्षा जास्त मागणी आल्यास कामे थांबवावी लागतील किंवा स्वतःच्या तिजोरीतून खर्च करावा लागेल.
- दुसरे आव्हान म्हणजे अंमलबजावणी क्षमता. बायोमेट्रिक, Yuktadhara, साप्ताहिक प्रकटीकरण यासाठी पंचायत स्तरावर प्रशिक्षित मनुष्यबळ, इंटरनेट व वीज आवश्यक आहे.
- तिसरे, 60 दिवसांच्या विरामाचा अर्थ उर्वरित 305 दिवसांत 125 दिवसांची हमी पूर्ण करावी लागेल. यासाठी नियोजन अधिक काटेकोर असावे लागेल.

10. निष्कर्ष (Conclusion)

- MGNREGA ते VB-G RAM G हा प्रवास केवळ नाव बदल किंवा 25 दिवसांची वाढ नाही. तो "रोजगार देणारी योजना" ते "उपजीविका घडवणारे मिशन" असा बदल आहे. रोजगार हमी वाढली, किमान मजुरीला राष्ट्रीय तळ मिळाला, नियोजन एकत्रित झाले आणि तंत्रज्ञान अनिवार्य झाले. मात्र या मिशनचे यश हे केंद्र-राज्य निधी वाटप आणि ग्रामपंचायत स्तरावरील प्रभावी नियोजन यांवर अवलंबून असेल.

संदर्भ (References)

1. VB-G RAM G अधिनियम, 2025 - संसदेत मंजूर विधेयक
2. PRS Legislative Research - अधिनियम मंजूर सारांश
3. केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाची अधिसूचना व मसुदा नियम (जून 2026)
4. राज्य शासन परिपत्रके
5. MGNREGA अधिनियम, 2005